जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 APR 2021
तरुण भारत

# विद्यापीठच्या ऑनलाईन परीक्षांमध्ये बदल नाही

प्रतिनिधी
कोल्हापूर

कडक निर्बंधांमुळे सर्व व्यवहार ११ नंतर बंद केले आहेत. त्यामुळे विद्यापीठांच्या ऑनलाईन परीक्षेत बदल होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. आतापर्यंतच्या सर्वच परीक्षा किरकोळ अडचणी वगळता सुरळीत पार पडल्या. परीक्षाच ऑनलाईन असल्याने या परीक्षांमध्ये काही बदल होणार नाही, अशी माहिती परीक्षा, मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी परीक्षा मार्चपासून ऑनलाईन आणि ऑफलाईनने सुरू आहेत. सरकारने संचारबंदी जाहीर केल्यानंतर ६ ते १२ एप्रिल दरम्यानच्या परीक्षा पुढे ढकलल्या होत्या. त्यानंतर ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेमध्ये नावनोंदणी करण्यासाठी १० एप्रिलपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर क्लस्टर पद्धतीच्या परीक्षांसह सर्व परीक्षा १५ एप्रिलपासून सुरू ऑनलाईन सुरू झाल्या आहेत. मंगळवारी राज्य सरकारने सकाळी ७ ते ११ या वेळेतच सर्व व्यवहार सुरू राहतील असा निर्णय जाहीर केला.

**प्रभारी संचालक गजानन पळसे यांची माहिती**

त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या परीक्षेत काही बदल केला आहे का अशा शंका येत होत्या. परंतू सर्वच परीक्षा ऑनलाईन असल्याने विद्यापीठाच्या परीक्षेत बदल होणार नाहीत, अशी माहिती परीक्षा संचालक पळसे यांनी दिली.